FAX NO. :                                   Oct. 17 2012 05:15PM P1

SHREE GANESH MULTISERVICE          FAX NO. : 02402405522          17 Oct. 2012  5:14PM  P1

वनविभाग, सामाजिक वनीकरण व वनविकास महामंडळातील योजना/योजनेत्तर फंडातून वेतन मिळणाऱ्या रोजंदारी मजुरांना नियमित करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र. बैठक-२०१०/प्र.क्र. ७/फ-९
मंत्रालय मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १६ ऑक्टोबर, २०१२.

**वाचा:-**

१) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. एलएबी- १०९४/प्र.क्र.२५२/फ-९, दिनांक ३१.१.१९९६,
२) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. एलएबी- १०९४/प्र.क्र. २५२/फ-९ दिनांक १६.३.१९९८,
३) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. एलएबी- १०९७/२६४६/प्र.क्र.२५ /फ-९, दिनांक २९.१.२०००,
[illegible]
१०/(२)/ आस्था/दोन /प्र.क्र. ६/१८७/२०११-१२, दिनांक २४.१०.२०११,

**प्रस्तावना:-**

रोजंदारी मजुरांच्या सेवेचा प्रदीर्घ कालावधी विचारात घेऊन काही अटी व शर्तीच्या
अधीन राहून दिनांक ३१.१.१९९६ च्या शासन निर्णयान्वये १०,२६४ अधिसंख्य वनमजुरांची पदे निर्माण
करण्यात आली. वनविभागामध्ये योजनांतर्गत/योजनेत्तर निधीतून ज्या रोजंदारी मजुरांनी दिनांक १.११.१९९४
रोजी दिनांक १.११.१९८९ ते दिनांक ३१.१०.१९९४ पर्यंत प्रत्येक वर्षी २४० दिवस अशी ५ वर्षांची सलग सेवा
पूर्ण केली आहे, अशा मजुरांना शासन निर्णय दिनांक ३१.१.१९९६ मधील काही अटी व शर्तीनुसार नियमित
करण्यात आले. त्यानंतर सदर शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार पात्र असून राहून गेलेल्या रोजंदारी
मजुरांना दिनांक १६.३.१९९८ व दिनांक २९.१.२००० च्या शासन निर्णयान्वये नियमित करण्यास मंजुरी देण्यात
आली. तथापि शासनाच्या दिनांक २९.१.२००० च्या शासन निर्णयानंतर वन विभागामध्ये न्यायालयीन
आदेशाच्या व्यतिरिक्त मजुरांना कायम करण्यात आलेले नाही.

वन विभागात वनसंवर्धन, वनसंरक्षण व विकासाची कामे उपलब्ध अनुदानाप्रमाणे राबविली
जातात. वनीकरण, रोपवाटिकेमध्ये रोपे तयार करणे, रोपवनाची देखभाल करणे, जंगलातून माल निष्कासित
करणे, विश्रामगृहातील कामे करणे इत्यादी विविध प्रकारच्या विभागातील कामावर आवश्यकतेनुसार
रोजंदारीवर मजूर लावण्यात येतात. रोजंदारी मजुरांना किमान वेतन दराप्रमाणे मजुरी व राहणीमान भत्ता

देण्यात येतो. अशाप्रकारे रोजंदारीवर लावण्यात आलेले मजूर वर्षानुवर्षे सतत कार्यरत आहेत अशा वनमजूर
कायम करुन नियमितपणाचे फायदे देण्याचा विचार शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णयः-**

याबाबत सविस्तर अभ्यास करुन शासनास शिफारस करण्यासाठी अपर प्रधान मु
वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या अध्यक्षेतखाली एक अभ्यास गट
नियुक्ती करण्यात आली. सदर अभ्यास गटाने दिलेल्या अहवालानुसार वन विभागातील रोजंदारी वर व
करणा-या वनमजूरांची ५ वर्षापेक्षा जास्त सेवा झालेल्या अशा वनविभागाचे ५०८९, सामाजिक वनीक
विभागाचे ४५१ व वन विकास महामंडळाचे १००६ अशा योजना/ योजनेत्तर निधीतून दैनंदिन मजूरी घेण
व दिनांक १.११.१९९४ पासून दिनांक ३०.६.२००४ पर्यंत सलग पध्दतीने अथवा तुटक-तुटकरित्या प्रति
किमान २४० दिवस या प्रमाणे किमान ५ वर्षे काम केलेल्या, दि.१.११.१९९४ पासून दि.३०.०६.२००४
कार्यरत असणा-या एकूण ६,५४६ रोजंदारी मजूरांना दिनांक १.६.२०१२ पासून शासन सेवेत कायम करण
निर्णय घेण्यात येत आहे. या निर्णयाच्या अनुषंगाने वन विभागातील ५,०८९ रोजंदारी मजूरांना शासन
कायम करण्यासाठी ५,०८९ अधिसंख्य पदे निर्माण करण्यास करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

१) वन विभागातील दि.१.११.१९९४ ते दि. ३०.०६.२००४ पर्यंत सलग पध्दतीने किंवा तुटक
रित्या प्रतिवर्षी किमान २४० दिवस याप्रमाणे किमान पाच वर्ष काम केलेल्या ५०८९ रोज
कामगारांपैकी दि. १.०६.२०१२ ला कामावर असण्यास पात्र ठरणा-या कामग
मंत्रीमंडळाच्या निर्णया प्रमाणे खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून कायम करण्यात यावे
   i. त्यांना पूर्वीचे वेतन व तद्अनुषंगीक लाभ देय होणार नाही.
   ii. त्यांना दि.१.०६.२०१२ रोजी प्रचलित सेवानियमानुसार वेतन व महाराष्ट्र
   सेवेच्या तरतुदी लागू राहतील,
   iii. उपरोक्त ५०८९ रोजंदारी कामगारांना वरीष्ठता व पात्रतेचे निकष लावून
   करण्यात यावे.
   iv. उपरोक्त ५०८९ रोजंदारी कामगारांना कायम करण्यांत यावे तथापी कु
   आर्थिक लाभ देण्यापूर्वी कायम करावयाचे सदर ५०८९ कामगारांची नावां
   व विभागनिहाय अंतिम यादी शासनास सादर करण्यात यावी.

२) पाच वर्षाच्या सलग सेवेच्या कालावधीची गणना करताना वन विभागातील योजनाअंत
योजनेत्तर योजनेवर रोजंदारी मजूरांनी प्रत्येक वर्षात २४० दिवस काम केलेले असावे. या
५ वर्षाचा कालावधी मोजताना रोजगार हमी योजना किंवा रोजगार हमी देणाऱ्या
योजनेवर केलेल्या कामाचे दिवस विचारात घेण्यात येवू नयेत.

4400
16
60
4600
1600

३) दिनांक ३१/१/१९९६ च्या निर्णयाप्रमाणे त्यावेळी पात्र असलेले तथापी काही कारणामुळे नियमीत न झालेले रोजंदारी मजूरांची सेवा नियमीत करण्यात याव्यात.

४) वनमजूरांना गट-ड मध्ये नेमणूक करण्याकरिता वयोमर्यादे संबंधीची अट शिथील करण्यात यावी, तथापि, दि.१.६.२०१२ रोजी त्यांचं वय सेवानिवृत्तीसाठी विहित वयोमर्यादेपेक्षा जास्त नसावे. तसेच गट-ड करिता आवश्यक असलेली विहित शैक्षणिक पात्रतेची अट देखील शिथिल करण्यात येत आहे.

५) काही वनमजूरांनी त्यांच्या रोजंदारी कामगारासंबधी नियमित करण्याबाबत प्रकरण विविध स्तरावर न्यायप्रविष्ट केली असल्यास, अशा प्रकरणात न्यायप्रविष्ट असताना सेवा नियमित करणे शक्य होणार नसल्यामुळे अशा प्रकरणात संबंधितानी न्यायप्रविष्ठ सर्व प्रकरणी परत घेतल्यानंतरच त्यांच्या सेवा नियमित करण्यात याव्यात.

६) सदर पदे गट-ड मध्ये निर्माण करण्यात येत असल्यामुळे या मजूरांना वनमजूर संबोधण्यात यावे व ही पदे गट-ड अधिसंख्य पदं मंजूर संवर्गात समय वेतनश्रेणी रु.४,४४०-७४४० श्रेणी ग्रेड वेतन १३०० मध्ये निर्माण करण्यात येत आहेत.

७) सदर वनमंजूरांना प्रचलीत महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू राहतील.

८) ज्यांची वन विभागातील सलग पध्दतीने अथवा तुटक-तुटकरित्या सेवा पांच वर्षापेक्षा जास्त झालेली आहे, त्यांचा वन विभागातील गट क व गट ड मधील रिक्त पदे भरतांना नेमणुकीसाठी खालीलप्रमाणे विचार करण्यांत यावा.

अ) सेवायोजन कार्यालयामार्फत ज्या पदांवर भरती करण्यांत येते त्याच पदावर भरती करण्यांत यावी. त्या पदांवर भरती करण्यांस सेवायोजन कार्यालयाची अट शिथील करण्यांत येत आहे.

ब) वेळोवेळी शासन निर्देशानुसार परवानगी देण्यांत आलेल्या निवड मंडळामार्फत ज्या पदावर भरती करण्यांत येते त्याच पदावर भरती करण्यांत यावी. शासनाचे भरती नियमातील संबंधित पदांकरीता असणा-या आवश्यक अर्हता व अटी शर्ती लागू राहतील.

क) गट क किंवा गट ड साठी नेमणूक करतांना फक्त वयोमर्यादा संबंधीची अट खालीलप्रमाणे शिथील करण्यांत यावी.

१. वयाच्या ३३ वर्षांनंतर (संबंधित) मजूर जेवढी वर्षे वन विभागात कार्यरत आहेत तेवढ्या वर्षांनी वयाची अट शिथील करण्यांत यावी. उदाहरणार्थ ज्यांनी ५ वर्षे सेवा केलेली असेल त्यांना वयाच्या ३८ वर्षे पर्यंत व ज्यांनी १२ वर्षे सेवा केलेली असेल त्यांना वयाच्या ४५ वर्षांपर्यंत वयाची अट शिथील करण्यात यावी..

८) शासनाने अंशकालीन कर्मचा-यांबाबत निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार त्यांच्याकरिता शासनात सरळ सेवा भरतीमध्ये समांतर आरक्षण ठेवून त्यांच्याकरिता प आरक्षित केली आहेत. त्याप्रमाणे वन विभागात सरळसेवी भरतीवेळी पात्रता पूर्ण करि असणा-या रोजंदारी मजूरांना गट क व गट ड मध्ये १० % आरक्षित ठेवण्यात यावीत अंशकालीन कर्मचा-यांना वयाच्या संदर्भात देण्यात आलेली सूट(४६ वर्ष) यांनाही देण्यात यावी.

९) निर्माण करण्यात येणारी पदे संबंधित मजूर सेवेत असेपर्यंत चालू राहतील व कोणत्याहि कारणाने मजूर सेवेतून कमी झाल्यास ते आपोआपच रद्द होईल. त्यांच्या रिक्त पदावर दुसऱ्या मजूराची नेमणूक करण्यात येऊ नये.

१०) या वनमजूरांना सध्याच्या वनमजूरीमध्ये समाविष्ट असलेले कोणतेही काम ,तसेच आवश्यकतेनुसार वनविभागात उपलब्ध असलेली गट-ड ची समकक्ष कामे देण्यात यावीत.

११) यापुढे वनविभागातील हंगामी कामासाठी रोजंदारी मजूरांची आवश्यकता भासल्यास हंगामी कामाशिवाय इतर कोणत्याही कामावर बारमाही कामावर मजूर घेण्यात येवू नये. हंगामी कामासाठी घ्यावयाच्या मजूराच्या सेवा कोणत्याही परिस्थितीत ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी लागू करण्यात येवू नये.

१२) दिनांक ३०.०६.२००४ रोजी पाच वर्ष पूर्ण न केलेल्या परंतु रोजंदारी मजूर म्हणून कार्यरत असलेल्या मजूरांच्या आवश्यकतेबाबत आढावा घेण्यात यावा व त्याची आवश्यकता नसल्यास त्यांना विहीत पध्दतीने कामावरुन कमी करण्यात यावे.

१३) सदर मजूरांच्या आस्थापनेवरील खर्चासाठी प्रत्येक वर्षात आवश्यकतेनुसार अर्थसंकल्पीत तरतूद करण्यात यावी.

१४) सामाजिक वनीकरण विभाग, ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या अधिपत्याखाली येत असल्याकारणाने आवश्यक तेवढी वनमजूरांची अधिसंख्य पदे निर्मितीबाबतची आवश्यक कार्यवाही ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडून करण्यात यावी.

१५) वन विकास महामंडळाच्या बाबतीतही १,००६ पदे त्यांच्या महामंडळात त्यांच्याकडूनच निर्माण करावी लागतील. निर्णयानुसार यांच्या मजूरावरील दिनांक १.६.२०१२ पासून अदा करावयाचे वेतन त्यांच्या स्त्रोतातून भागविण्यात येणार आहे. त्यानुषंगाने याबाबतची आवश्यक ती कार्यवाही वनविकास महामंडळाने करावी.

१६) सदर पदांचा खर्च मागणी क्र सी ७ - २४०६ वनीकरण व वन्यजीवन १०१ वनसंधारण व विकास १०१ (१२) वनमजूरांच्या अधिसंख्य पदांची निर्मिती (२४०६-१८९८) या लेखाशीर्षाखाली सन २०१२- १३ च्या मंजूर अनुदानातून भागवण्यात यावा.

१७) सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(विवेक खांडेकर)
सहसचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक ([illegible]), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५. प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा महा संचालक, सामाजिक वनीकरण, पुणे.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक ( प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७. सर्व मुख्य वनसंरक्षक
८. सर्व उपवनसंरक्षक
९. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१०. फ-९ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.(निवडनस्ती)